# बौध्दांचा १०० कोटीचा सामाजिक फंड उभा करणे आहे.

प्रत्येक कुटूंबाच्या जडणघडणीकरीता, योग्य संरक्षणाकरीता आणि विकासाकरीता आर्थिक मजबूतीची गरज असते, धन द्रव्याची गरज असते. कुटूंबातील मूला-बाळाच्या शिक्षणाकरीता पैसा पाहिजे, मुलांसाठी घर घेण्यासाठी किंवा बांधण्यासाठी पैसा पाहिजे, कुटूंबातील सदस्यांच्या आजार पणात औषधांना, डॉक्टरला पैसा पाहिजे. कुटूंबाचे योग्य संगोपन आणि सुरक्षितता जतन करण्यासाठी पैसा पाहिजे धन द्रव्य कुटूंबाच्या संरक्षणासाठी आणि उन्नतीसाठी फार गरजेचं आहे.

तसचे धम्माच्या रक्षणासाठी समाजाच्या सामुदायिक विकासासाठी सार्वजनिक फंड उभा करण्याची, धन द्रव्याची फार गरज असते. सुशिक्षित, सभ्य आणि प्रगत समाज या बाबीला चांगल्या प्रकारे जानत असतो आणि आपल्या समाजाच्या उन्हतीसाठी त्या समाजातील सुशिक्षित लोक, समाजात तशी व्यवस्था करीत असतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी इंग्लडच्या प्रगतमय समाजाचा अभ्यास करून सांगितले की इंग्लडच्या ख्रिश्चन समाजाने सेवायुक्त मिशनरी कार्यासाठी सामुदायिक फंड जमा केला आणि धर्म प्रचाराकरीता, समाज उन्हतीसाठी खर्च करण्यात आला (पेज ४५०-४५१, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रायटिंग ॲण्ड स्पिचेस खंड.५ प्रकाशक म.शासन १९८९.) समाजाच्या उन्हतीसाठी स्वतंत्र सामाजिक फंडाची फार गरज असते.

आज आपण पाहतो की मुस्लीम धर्मियांकडे मोठा फंड जमा आहे. ख्रिश्चन धर्मियांकडे मोठा फंड जमा आहे. भारत सरकारच्या एका रिपोर्ट प्रमाणे सन २००९ ते २०१० मध्ये विदेशातील ख्रिश्चन ट्रस्टने हजारो कोटी रूपये भारतात पाठविले, (रेफ. इंडीया होम मिनिस्ट्री रिपोर्ट पी.के.सिंग, जाने २०१२. गुगल मेल) त्यांच्याकडे सामाजिक फंड जमा केला जातो म्हणून ते त्यांच्या देशात खर्च करतात आणि विदेशात सुध्दा पाठवित असतात.

ख्रिश्चन समाजाकडे सामाजिक फंड आहे, मुस्लीम, शिख , हिन्दु, जैन या सर्व समाजाकडे सामाजिक फंड आहे. ख्रिश्चन समाजातील प्रत्येक व्यक्ति आपल्या मिळकतीचा दहा टक्के भाग धर्मकार्याला चर्चला देत असतो. मुस्लीम लोक आपल्या कमाईतला काही ठरविक भाग, धर्म कार्याला देत असतात, शिख धर्मिय, हिन्दु धर्मिय, आपल्या मिळकतीचा काही हिस्सा, नेहमी धर्म कार्याला पूजा प्रार्थना करून दान करीत असतात.

महामानव बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाला जागविले संघटीत केले आणि समाजाच्या विकासाकरीता आणि योग्य जडन-घडनीकरीता समाजातील लोकांनी धम्म आणि समाज कार्यासाठी प्रत्येकांनी आपल्या मिळकतीचा २० वा हिस्सा दान करावा. समाजोन्नती कार्याला द्यावा. विसावा हिस्सा म्हणजे (५%) पाच टक्के होतात. प्रत्येक कमविणाऱ्या माणसानी स्वतःहून किमान ५% दान दिलं पाहिजे असे बाबासाहेब आंबेडकर नेहमी सांगीत असत.

तथागत भगवान बुध्द म्हणतात समाजाच्या धार्मिक शैक्षणिक, उन्नतीसाठी प्रत्येक उपासक, उपासिकांनी नियमित दान देणे शिकले पाहिजे, प्रत्येकांनी दान पारमितेचे पालन केलं पाहिजे, **(दक्खिणा विभंग सुत्त, पेज ३०३, मज्झिम निकाय पालि )** प्रत्येकांनी आपल्या व्यक्तिगंत आर्थीक सामर्थ्या प्रमाणे दान दिलेच पाहिजे. निरंतर दान देण्याचा अभ्यास केला पाहिजे. त्यांचा प्रत्येक व्यक्तिला अनंत लाभ मिळत असतो, तथागत बुध्दाचे प्रवचन नेहमी दान, शिल, भावना या पासून सुरू होत असत. (पेज ४२, बिंबिसार, विनय पीटक पालि महा वग्ग, धम्मगिरी प्रकासन १९९८) दान देणे, स्वतःला देण्याची सवय लावणे, दान पारमिताचे पालन करने, दान पारमीता पूर्ण करणे प्रत्येक व्यक्तिच्या आध्यात्मिक परम उध्दारासाठी अत्यंत गरजेची असते म्हणूनच सर्व धर्मियांमध्ये दान कार्याला, फार महत्व दिले आहे. आपल्या सामर्थ्यानुसार, श्रीमंतानी आणि गरीबात गरीबांनी सुध्दा सत् धम्मासाठी दान देने, समाजासाठी दान देणे फार महत्वाचे मानले जाते. बौध्द देशात वारंवार दान देण्याचा संकल्प केला जातो, आणि नेहमी दान दिले जाते . आपण शुध्द भावनेनी सत् धम्माकरीता जे काही दान देतो, ते चिरतनं, शिल्लक राहते, बाकी सर्व काही संपूण जात असते. अंतसमयी, शेवटच्या क्षणी मृत्युच्यावेळी सर्वकाही येथेच सोडून जावे लागते. धन-दौलत, घर-दार, जमीन जायजाद सर्वकाही येथेच सोडावे लागते. आपले सुंदर प्रिय शरीरसुध्दा येथेच सोडावे लागते, काहीही सोबत येत नाही, बुध्द म्हणतात केवळ कुशल कर्मफळ आणि दान पारमीता सोबत असतात, म्हणून दान देणे फार महत्वाचे आहे. महामानव बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुध्दा दान कार्याचे फार मोठे महत्व सांगितले आहे. प्रत्येक सभ्यव्यक्तीने आपल्या मिळकतीचा विसावा हिस्सा सत् धम्मासाठी समाजकार्यासाठी दान करावा असे बाबासाहेब सांगत असत. बोधिस्तव बाबासाहेब आंबेडकर जीवन भर दुसऱ्याच्या सुख शांतीसाठी, दुसऱ्याच्या हालअपेष्ठा दूर करण्यासाठी अनेक प्रकारे दान करीत राहिले, प्रत्येकानी स्वतःला दान देण्याची सवय लावून घेणे फार महत्वाचे आहे.

त्याग आणि दान कार्यातूनच सत् धम्म जतन केला जातो, समाजात सेवा भावनेला जीवंत ठेवले जाते, सेवाभावनेनी कार्य केली जातात. मंदीर, मस्जीद, गुरूद्वारे, बुध्द विहारे हे सर्व काही महान दान आणि त्यागाचे प्रतीक असतात. एवढेच जपलं जाव की त्याचा गैर वापर होवू नये. नेहमी सदुपयोग व्हावा. परंतु दान हे प्रत्येक मानसाच्या मनाला, लोभ मुक्त करण्यास, विकार मुक्त करण्यास परिसुध्द करण्यास मोठे सहाय्यक ठरते. अनेक महापुरूषांनी दान कार्याची नेहमी प्रशंसाच केलेली आहे. लोभ - मोह, आसक्ती मानसाला दुर्गतीला नेत असते. परंतु उदार भावना, दान चेतना, दान पारमीताचा अभ्यास मानवाचा उध्दार करीत असतो. त्याग आणि दान कार्यानेच माणूस समाजात मोठा होतो.

समाजाच्या सार्वंगीन विकासाकरीता, सार्वजनिक फंडाची मोठी गरज आहे त्यागी, सभ्य आणि बुध्दिमान मानसांचा तो संकल्प असतो की समाजात सत् धम्माच्या जतना करीता सार्वजनिक समाज सेवेकरीता सामाजिक फंड असलाच पाहिजे. सामाजिक फंडातून आपण गरीब दुर्बलांची सेवा करू शकतो. दुःखी-कष्टी लोकांना काहीतरी आधार देवू शकतो, सत् धम्माचे योग्य जतन करू शकतो, उपासक उपासकांसाठी, विद्यार्थ्यासाठी प्रशिक्षणाचे विविध वर्ग चालवू शकतो, मानसाला सक्षम बनविण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण फार महत्वाचे आहे, योग्य प्रकारे श्रामणेर भिक्खु प्रशिक्षण प्रोजेक्ट राबवू शकतो, होतकरू हुशार, गरीब विद्यार्थ्यांना, परदेशात उच्च शिक्षणाकरीता पाठवू शकतो. गरीब लोकांना मदत करू शकतो, काही निराधार, आजारी लोकांना मदत करू शकतो, सुंदर सर्वांग परिपूर्ण

असे, विदेशी बुध्द विहाराप्रमाणे, आपण देखील अनेक सुंदर बुध्दविहारे बांधु शकतो, समाजाच्या कठीण अडीअडचणी प्रसंगी समाज फंडातून लोकांना मदत करू शकतो. समाजावरील अन्याय, थांबविण्यासाठी आणि योग्य न्याय मिळविण्यासाठी समाज फंड वरदान ठरत असते. आज पैश्या शिवाय न्याय सुध्दा मिळत नाही. आपल्या सामाजिक हक्काचे जतन करण्यासाठी कधी कधी आंदोलने महत्वाची असतात. त्यासाठी सुध्दा पैसा लागतो. सत् धम्माचे सुविचाराचे जतन करण्यासाठी पैसा लागतो, सत् धम्माच्या प्रचार प्रसारासाठी पैसा लागतो, सुविचाराच्या प्रचार प्रसारासाठी पैसा लागतो. प्रत्येक चांगल्या तत्वाला चांगल्या बाबीनां पुढे नेण्यासाठी पैसा लागतो, आदर्शाला पुढे नेण्यासाठीसुध्दा पैसा लागतो. म्हणून समाजाच्या योग्य विकासासाठी आणि वैज्ञानिक उत्थानासाठी ''सामाजिक फंडजमा '' करण्याची अत्यंत गरज आहे.

हया सर्व बाबी विचारात घेवून जगातील अनेक देशातील गाढा अनुभव नजरेसमोर ठेवून जगप्रसिध्द पुज्य भदंत डॉ. राहुल बोधी महाथेरो यांनी भारतीय बौध्द समाजाचा ''सार्वजनिक सामाजिक फंड'' निर्माण करण्यासाठी महान संकल्प केला आहे. आदर्श आणि मजबूत बौध्द समाज घडविण्याकरीता, अनेक कल्याणकारी योजना राबविण्याकरीता, सामाजिक फंड उभे करणे अत्यंत महत्वाचे आहे. त्या साठी समाजातील सर्व क्षेत्रातील त्यागी विद्वान आणि समाज दर्दी, सेवा भावी, उद्यमी, कर्तव्य दक्ष समाजहीतकारी त्यागी बंधुभगीनीना, उपासक उपासिकांना या दिशेनी जागृत करून सवसमावेशक, आणि व्यापक मोठी योजना आखली आहे. सर्व समावेशक त्यागी कर्तबगार उपासक उपासिकांची एक सार्वजनिक कमीटी किंवा ट्रस्ट निर्माण करून वैज्ञानिक पध्दतीने १०० कोटी रूपयाचा मोठा फंड जमा करण्याचा निर्धार केला आहे. सर्व समावेषक कमीटी निर्माण केली जाणार आहे त्या साठी प्रथम मुंबई शहरातील वेगवेगळया विभागामध्ये प्रथम सभासद मोहीम आखली जाणार आहे. त्या नंतर अनेक सभासदांच्या विचाराने निवडणुकीने **''एक केन्द्रीय कमीटी''** निर्माण केली जाणार आहे. त्या निवडून आलेल्या केन्द्रीय कमीटीच्या नेतृत्वाने **किमान १०० कोटीचा** सामाजिक फंड उभा करण्याचा महान संकल्प आहे. त्यागी सामाजिक कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने वेग वेगळ्या ठिकाणी मिटींगा आयोजित केल्या जाणार आहेत. समाज दर्दी, समाजातील बुध्दीमान जागृत लोकांनी सेवा आणि कर्तव्य भावनेनी या महान मोहीमे मध्ये सहभागी व्हावे, समाजाला जागृत करावे, आपले योगदान द्यावे. प्रथम सभासद मोहीम राबवावी आणि वैज्ञानिक पध्दतीने आदर्श समाज बांधनीसाठी सर्वांनी पुढे यावे, सर्वोपरी सहकार्य करावे असे आव्हान **जगप्रसिध्द पुज्य भदन्त डॉ. राहुल बोधी महाथेरो, (एम.ए.पी.एच.डी.,) विपश्यनाचार्य** यांनी केलेले आहे. आपल्या सर्वांच्या त्यागाची आणि सहकार्याची गरज आहे. त्रिरत्नानुभावे सर्वांचे मंगल होवो ! नमो बुध्दाय ! जयभिम !

**संपर्क : चव्हाण :९२२४३०३९२२**
**फोन : २५२२०७३८ / फॅक्स : २५२९९४७७**
**सर्वोदय महाबुध्द विहार, लो.टिळक नगर**
**रेल्वे टर्मिनस समोर, टिळक नगर**
**चेंबूर मुंबई - ४०० ०८९**

**Coordinator, संयोजक ,**
**डॉ.पूज्य भदंत राहुल बोधी महाथेरो, मुंबई**
**M.A. Phd. विपश्यनाचार्य.**